**महात्मा फुले कृषि विद्यापीठ,**
**राहुरी,जि.अहमदनगर.**

# नागरीकांची सनद (प्रारुप)

प्रस्तावना:–

१. भारत हा कृषि प्रधान देश असल्याने देशाची एकंदरीत आर्थिक प्रगती प्रामुख्याने शेतीच्या उत्पादनावर अवलंबून असते. शेती हे प्राथमिक क्षेत्र असल्याने शेतीचा विकास शास्त्रीय पध्दतीने करुन नविन तंत्रज्ञानाचा फायदा शेतीसाठी व शेतक–यासाठी व्हावा यासाठी कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. या कृषि विद्यापीठाच्या कार्याचा मुळ उद्देश कृषि शिक्षण, कृषि संशोधन व कृषि विस्तार शिक्षण असून, कृषि क्षेत्रातील कार्यक्षम मनुष्यबळ निर्माण करुन त्याचा उपयोग कृषि अभियांत्रिकी, पशूसंवर्धन व मत्स्य विभाग, वन विभाग या क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन देणे हे आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनास निरनिराळे कृषि विषयक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तांत्रिक सल्ला देणे, तसेच अखिल भारतीय स्तरावर संशोधन करण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्यामार्फत कृषिच्या संदर्भातील धोरणे राबविण्यासाठी सहाय्य करणे.

२. कृषि विद्यापीठात विकसीत झालेले तंत्रज्ञान, कृषि खाते आणि सुधारित वाणांचे बियाणे, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळामार्फत शेतक–यांपर्यंत पोहचवीले जाते. विद्यापीठात विकसित झालेल्या कृषि तंत्रज्ञानाच्या विस्ताराची जबाबदारी ही शासनाच्या कृषि खात्याकडे आहे. कृषि विद्यापीठांकडे विस्तार शिक्षणाचा महत्वाचा भाग असून त्याव्दारे विस्तार कार्यकर्ते, ग्रामविस्तारक, विषय विशेषज्ञ, विविध खात्यातील अधिकारी, शेतकरी आणि शेतकरी महिला यांना प्रशिक्षण दिले जाते. लिखित साहित्य, प्रसार माध्यमे, विविध संपर्क पध्दतीव्दारे कृषि विषयक माहिती प्रसारीत केली जाते.

३. कृषि विद्यापीठाचे प्रमुख उदिष्ट कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण हे असल्याने या विद्यापीठाकडून कृषि विषयाशी संलग्न परंतू वाणिज्यिक स्वरुपातील थेट सेवा जनतेस पुरविल्या जात नाहीत किंवा तसा सेवा पुरविणेचा परस्पर संबंध येत नाही. तथापि, कृषि विद्यापीठाकडून खालील मुद्यांबाबत शेतक–यांना माहिती देण्यात येते आणि त्यांच्या समस्या सोडविणेसाठी मार्गदर्शनाचे काम केले जाते.

## ४. विद्यापीठाकडून पुरविल्या जाणा–या सेवा

१. **माती परिक्षण** : मातीचा नमुना प्राप्त झालेनंतर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रयोगशाळेत परिक्षण करून १५ (पंधरा) दिवसामध्ये अहवाल दिला जातो. ही सेवा विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात पुरविली जाते. अशी सेवा विद्यापीठ मुख्यालय, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे व कोरडवाहू संशोधन केंद्र, सोलापूर येथे उपलब्ध आहे.

२. **पाणी परिक्षण** : पाण्याचा नमुना प्राप्त झालेनंतर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रयोगशाळेत परिक्षण करून १५ (पंधरा) दिवसामध्ये अहवाल दिला जातो. ही सेवा विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात पुरविली जाते. त्यासाठी सोबतच्या तक्त्याचे अवलोकन करावे. अशी सेवा विद्यापीठ मुख्यालय, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे व कोरडवाहू संशोधन केंद्र, सोलापूर येथे उपलब्ध आहे.

३. **पिकांचे फिरते चिकित्सालय** : पिकांचे फिरते चिकित्सालयाव्दारे कृषि विद्यापीठ अंतर्गत सर्व विभागीय व जिल्हा विस्तार केंद्राव्दारे (राहुरी, कोल्हापूर, डिग्रस, पाडेगांव, धुळे, जळगाव इ.) पुर्व नियोजीत वेळापत्रकानुसार संबंधीत गावामध्ये जाऊन शेतकऱ्यांनी आणलेले माती व पाण्याचे नमुने तपासले जातात. सदर नमुन्यांचे केवळ सामु व क्षारतेचे पृथ:करण करून जमीन सुधारणा व खत व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी आणलेले पिकांचे नमुन्यांचे किड रोग प्रादुर्भावाचे निदान करून त्यांना त्यावर किड व रोग नियत्रंणांचे उपाय सुचविले जातात.

५. <u>मार्गदर्शन व सल्ला</u>

१. केंद्र/राज्य शासन/भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून आखून आलेल्या प्रमाणकानुसार व विषयानुसार शेतकरी प्रशिक्षण/मेळावा/चर्चासत्र आयोजित करुन कृषि माहिती व तंत्रज्ञान पुरविणे मार्गदर्शन करणे, समस्या सोडविणे.

२. **<u>दूरभाष्य सेवा</u>**. विद्यापीठाच्या कृषि माहिती व तंत्रज्ञान केंद्रातील विविध विषय तज्ञाकडून दुपारी २ ते ५ या वेळात दूरध्वनी क्र. ९५–२४२६–२४३८३१ आणि किसान कॉल १५५१ वरुन कृषि विषयक प्रश्नांची उत्तरे व मार्गदर्शन केले जाते.

३. आकाशवाणी व दूरदर्शनवरुन वेळोवेळी शेतीविषयक माहिती प्रसारित केली जाते.

४. छपाई माध्यमातून उदा. प्रतिवर्षी कृषि दर्शनी (दैनंदिनी), श्रीसुगी (त्रैमासिक) (ही प्रकाशने विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात पुरविली जातात) तसेच फुले कृषि वार्ता व विविध विषयाच्या घडी पत्रिका इ. प्रकाशनाव्दारे व वृत्तपत्रातून लेख प्रसिध्द करुन माहिती व मार्गदर्शन केले जाते.

६. <u>कृषि विषयक माहिती पुरविणे.</u>

१. कृषि प्रदर्शनातून व फोटो गॅलरीच्या माध्यमातून कृषिविषयक माहिती दिली जाते.
२. व्हिडीओ/सीडीव्दारे कृषि माहिती प्रसार केली जाते.
३. संगणक/इंटरनेटवरुन सर्व पिकांची व इतर माहिती पुरविणेची मोफत सुविधा.
४. कृषि औजारे व यंत्रांचा वापर करणेबाबत माहिती पुरविणे.
५. कृषि विषयक माहिती देणेसाठी पंढरपूर, शिर्डी, प्रकाशा आदी ठिकाणी कायम स्वरुपी माहिती केंद्राची स्थापना केली आहे. तसेच तिर्थक्षेत्री आणि जत्रा आदी ठिकाणी कृषि प्रदर्शन भरविले जाते. (उदा. गड्डायात्रा, सोलापूर)
६. कृषि विद्यापीठ कार्यक्षेत्रात शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची स्थापना केली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात एकुण ४० मंच स्थापन केले असून त्याचे १५०० शेतकरी सदस्य आहेत.

७. <u>कृषि विषयक उत्पादन विक्री</u>

१. विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध शेती पिकांच्या वाणांचे विद्यापीठ प्रक्षेत्रावर उत्पादीत बियाणे उलब्धतेनुसार मुख्यालय तसेच संलग्न संशोधन केंद्रावर विक्रीसाठी उपलब्ध केले जाते. सन २००५–०६ मध्ये पाच हजार क्विंटल बियणाचे उत्पादन करण्यात आले आणि या वर्षी (२००६–०७) एकूण नऊ हजार क्विंटल बियाणे उत्पादन करण्यात आले.

२. कलमे/रोपे तयार करुन विक्री केली जाते. सर्व साधारणपणे प्रतिवर्षी ९-१० लाख कलमे/रोपे तयार करुन विद्यापीठाने निश्चित केलेल्या दराने शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली जातात.

३. जैविक उत्पादने (जैविक खते व किटकनाशके) तयार करुन शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली जातात. (वरील उत्पादनाची विक्री विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरानुसार केली जाते)

४. गायी व म्हशी यांच्या वळूच्या गोठीत विर्याच्या मात्रा विद्यापीठाने निश्चित केलेल्या दराने शेतकऱ्यांना पुरविल्या जातात.

**(वरील उत्पादनाची विक्री विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरानुसार केली जाते. सविस्तर माहिती कृषि दर्शनी (दैनंदिनी) मध्ये देण्यात आलेली आहे.)**

८. **शैक्षणिक**

वरील परिच्छेदात दिलेले कार्यक्रम राबवित असतांना विद्यापीठातील शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रवेश देण्याची कार्यवाही प्रचलित नियमांच्या तरतूदीनुसार, **कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी** यांचे नियंत्रणाखाली पूर्ण केली जाते. या विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका व माळी प्रशिक्षण वर्गात विद्यार्थी/विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो आणि कृषि व कृषि अभियांत्रिकी संबंधीत विविध विषयाचा अभ्यासक्रम शिकविला जातो.

९. **संशोधन**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी जि.अहमदनगर अंतर्गत पाच हवामान पटयामध्ये एकूण २५ संशोधन केंद्रे व मध्यवर्ती प्रक्षेत्र, राहुरी येथे संशोधनाचे कार्य सुरु आहे. या संशोधन केंद्रावर खालीलप्रमाणे विविध शेती पिकांवर संशोधन सुरु आहे.

१) तृणधान्ये – भात, बाजरी, रब्बी व खरीप ज्वारी, गहू, मका
२) कडधान्ये – हरभरा, तूर, उडीद, मूग
३) गळीत धान्ये – भुईमूग,सोयाबीन, सुर्यफुल, करडई, तीळ
४) नगदी पिके – ऊस, कापूस, हळद, आले
५) फळपिके – आंबा, केळी, द्राक्षे, डाळींब, सिताफळ, आवळा, अंजीर, बेर
६) भाजीपाला पिके – टोमॅटो, वांगी, कांदा, भेंडी, कारली, वाल, काकडी
७) फुलझाडे – गुलाब, जरबेरा, कार्नेशन, निशीगंध, ग्लॅडीओलस
८) चारा पिके – ज्वारी, बाजरी, मका, ओट, बरसीम, लर्सुन घास, चवळी, संकरीत नेपीयर गवत, स्टायलो
९) औषधी व सुगंधी वनस्पती – अश्वगंधा, सफेद मुसळी, जावासिट्रोनेला, रोशागवत
१०) विविध पशुधन – गायी, म्हशी, शेळया, मेंढया
११) शेतीची यंत्रसामुग्री व अवजारे – ट्रॅक्टर, पावरटीलर, मळणी यंत्र इ.

या संशोधनाअंतर्गत विविध पिकांचे संकरीत व सुधारीत वाणांचा विकास करणे, त्यांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे, विविध फळझाडांची रोपे / कलमे तयार करणे, त्रिवेणी गाया व पंढरपुरी म्हशी यांच्या वळूच्या गोठीत विर्याचा मात्रा तयार करणे, विविध पिकांच्या पीक व्यवस्थापन, पीक उत्पादन व पीक संरक्षण इ. बाबींवर संशोधन करुन त्याविषयी शिफारशी शेतकऱ्यासाठी प्रसारीत केल्या जातात.

कृषि अभियांत्रिकी शाखामध्ये विविध शेतीची औजारे व यंत्रसामुग्री यांचा विकास करण्यात येतो, तसेच क्षारपड जमिनीची सुधारणा, जलसिंचन पध्दती, पाणी व्यवस्थापन पध्दती, खतांच्या मात्रा, शेतीमाल प्रक्रिया इ. विषयावर संशोधन केले जाते.

कृषि क्षेत्रातील अनेक बाबी विचारात घेऊन संबंधित विषयातील ज्ञान व तंत्रज्ञान विकसित करणेसाठी तसेच उन्नत जातीचे विविध वाण व संकरीत वाण तयार करणेसाठी संशोधन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या संशोधन केंद्रातील संशोधनाचा उपयोग शिक्षणासाठी व प्रत्यक्षात शेतक–याकडून शेतीमध्ये वापर करणेसाठी केला जातो.

## १०. शेतक–यांच्या अपेक्षा

१. विद्यापीठास भेट देणा–या किंवा दूरध्वनीव्दारे संपर्क साधणा–या शेतक–यास त्यांचे समाधान होईल अशा सोप्या व त्यांना समजेल अशा भाषेत माहिती देण्यात यावी, यासाठी विद्यापीठात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून अधिकारी/कर्मचारी सौजन्याने वागतील व सभ्यपणाने वागणूक मिळेल यासाठी प्रयत्नशिल राहतील.

२. विद्यापीठाकडून केल्या जाणा–या विक्रीमध्ये (उदा. बियाणे, प्रकाशने, रोपे इ.) विश्वासर्हता राहिल आणि शेतक–याचे हित जोपासले जाईल हा मुळ उद्देश असेल.

३. शेतक–यास केले जाणारे मार्गदर्शन, सल्ला व इतर माहिती उपलब्ध साधनांचा पुरेसा वापर करुन तत्परतेने व कोणतीही तक्रार राहणार नाही अशा रितीने करणेसाठी हे विद्यापीठ वचनबद्ध राहील.

## ११. तक्रारीचे निवारण

वरील विषयाच्या अनुषंगाने सेवा, सल्ला किंवा माहिती अथवा मार्गदर्शनाचे काम सुरळीतपणे न झालेस खालील अधिका–याकडे तक्रार नोंदविल्यास त्याची तातडीने दखल घेऊन उपाय योजना केली जाईल :–

(१) **संचालक, विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

(२) **संचालक, संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

(३) **संचालक, शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

(४) **सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, पुणे/धुळे/कोल्हापूर**

(५) **सहयोगी संशोधन संचालक, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, गणेशखिंड (पुणे)/सोलापूर/कोल्हापूर/इगतपुरी**

(६) **ऊस विशेषज्ञ, पाडेगाव (जि. सातारा), गहू विशेषज्ञ, निफाड (जि, नाशिक), तेलबिया विशेषज्ञ, जळगाव**

(७) **कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**